जा.क्र.नांवाश/मनपा/आवि/जेद/२५/२
नांवाश/मनपा.नांदेड
दिनांक - ३१/१२/२०२४

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## आरोग्य विभाग, १५ व्या वित्त आयोग अंतर्गत पदभरती सुचना

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड आरोग्य विभाग १५ व्या वित्त आयोग अंतर्गत आयुष्यमान आरोग्य मंदिर(दवाखाने) कंत्राटी स्टाफनर्स २० पदे व कंत्राटी एमपीडब्ल्यु २४ पदे इ. रिक्त पदाकरिता अर्ज मागविण्यात आले. त्याअनुसरुन सदर पदांकरिता उमेदवारांचे पात्र/अपात्र यादी (तात्पुरत्या स्वरुपात ) तयार करण्यात आली आहे. सदर यादीमध्ये अपात्र उमेदवाराचे अपात्रतेचे कारण शेरामध्ये नमुद केले आहे.

करिता अपात्र उमेदवारांनी त्याच्या अपात्रते विषयी काही आक्षेप/हारकत असेल तर उमेदवारांनी स्वतः हजर राहुन दि.०१.०१.२०२५ ते दि.०९.०१.२०२५ या कार्यालयीन सात दिवसाच्या (सुट्टीचे दिवस वगळून) कालावधीमध्ये वैद्यकिय आरोग्य अधिकारी,नांवाशमनपा,नांदेड यांच्या नावे आपले आक्षेप अर्ज (आक्षेप अर्जाचा नमुना सोबत जोडण्यात आला आहे.) प्रशिक्षण हॉल, मनपा दवाखाना जंगमवाडी, लॉयन्स क्लब डोळयाच्या दवाखान्याच्या पाठीमागे, जंगमवाडी, नांदेड येथे कार्यालयीन वेळेत आक्षेप/हारकत अर्ज आवश्यक ते कागदपत्रासह विहीत मुदतीत सादर करावेत.

नोंदः- १)विहीत मुदतीत आक्षेप/हारकत सादर न करण्याऱ्या उमेदवारांना अपात्र समजण्यात येईल वर नमुद कालावधी नंतर आक्षेप/हारकत ग्राहय धरण्यात येणार नाही.

२) उमेदवारांनी आक्षेप/हारकती सादर करताना आक्षेप/हारकत चा नमुना सोबत जोडण्यात आला आहे. त्यानुसार अपात्र उमेदवारांनी आक्षेप/हारकती स्वतः उपस्थित राहुन विहीत मुदतीत सादर करणे अनिवार्य असुन याकरिता पोस्टाने अथवा ईमेलद्वारे आक्षेप/हारकती स्विकारण्यात येणार नाहीत. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३)उमेदवारांने त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या आक्षेपाबाबत योग्य ते कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे तसेच नावासमोर दर्शविलेल्या आक्षेपाच्या शेऱ्याव्यतिरीक्त कुठलेही अतिरीक्त/अनावश्यक कागदपत्रे सादर करण्यात येवु नये तसेच आक्षेपा व्यतिरीक्त नव्याने कुठल्याही प्रकारचा अर्ज/कागदपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

**(आक्षेप अर्जाचा नमुना सोबत जोडण्यात आला आहे.)**

उप आयुक्त (आरोग्य)
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

CamScanner

दि.

# आक्षेप अर्ज

प्रति,
मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

विषयः- १५ व्या वित्त आयोग अंतर्गत कंत्राटी............ पदाकरिता आक्षेपाबाबत.
संदर्भः- नांवाशमनपा नांदेड मार्फत प्रसिध्द करण्यात आलेली पात्र/अपात्र यादी

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणास सविनय विनंती करण्यात येते की, १५ व्या वित्त आयोग अंतर्गत प्रसिध्द करण्यात आलेल्या पात्र/अपात्र यादीनुसार माझे नाव अपात्र/कागदपत्राच्या त्रुटीबाबत शेऱ्यामध्ये आले असुन याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप सादर करत आहे.

| अ. क्रं | आक्षेप सादर करण्याऱ्याचे नाव | टोकण नंबर (तात्पुरत्या पात्र/अपात्र यादीतील टोकण क्रं.) | अर्ज सादर केलेल्या जातीचा प्रवर्ग | आक्षेपाचे कारण/शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

माझ्याकडे सदर आक्षेपाचे निकारण करण्याकरिता वैद्य दस्तावेज असुन मी या आक्षेप अर्जासोबत जोडत आहे. तरी माझ्याद्वारे सादर करण्यात आलेल्या आक्षेपाबाबत योग्य तो बदल करण्यात यावी ही नम्र विनंती.

सोबत जोडण्यात येणारे कागदपत्रः-
१)
२)

(उपरोक्त आक्षेपअर्जासोबत सादर करण्यात आलेले कागदपत्र हे माझ्या माहितीनुसार योग्य असुन सदर कागदपत्रे अयोग्य असल्यास मी अपात्र राहील याची मला जाणीव आहे.)

स्वाक्षरीः-

नावः-
संपर्क क्रं.:-

CamScanner